MHST110000262019

## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.११/२०१९ मधील नि.५ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते १३ विरुध्द तूर्तातूर्त ताकिद मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**वादी यांचे कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे :–**

२. मौजे आगलावेवाडी, ता.जावली, जि. सातारा येथील खालील शेतजमीन मिळकती या दाव्याचा वादविषय असून येथून पुढे त्यास ''*दावा मिळकती* '' असे संबोधण्यात येत आहे.

| अ.नं. | स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| **१** | १६/१ | ०–२५ | ०–४७ |
| **२** | १६/४ | ०–१५ | ०–१६ |
| **३** | १६/७ | ०–२१ | १–१२ |
| **४** | १६/८ | ०–२१ | ०–२२ |
| **५** | १६/९ | ०–६३.२ | २–८१ |
| **६** | १६/१४ | ०–१५.२ | २–०६ |

३. वादीचे कथन की, वादीने दावा अग्रहक्क वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. दावा मिळकती या पूर्वी महसुल रेकॉर्डसदरी बिभवी, ता. जावली, जि.

या गावामध्ये स.नं.१९७/१, १९७/४, १९७/७, १९७/८, १९७/८ व १९७/१४ याने समाविष्ट होत्या. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे पूर्व हक्कदार हरीबा यांच्या वडीलार्जित आहेत. दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये व त्यांचे पूर्वहक्कदार यांच्यामध्ये आजअखेर सदर निरस मानाने लेखी अथवा तोंडी वाटप झालेले नाही. त्यामुळे जो तो आपापल्या सोईप्रमाणे दावा मिळकतीचे समाईकात एकत्र कुटुंबासाठी कब्जे वहिवाट करत आहे.

४. वादी पुढे कथन करतात की, दावा मिळकतींबाबत पूर्वी दावा झाला असून त्यामध्ये तडजोडज होवून दावा मिळकती या वादी प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाकडेच आहेत. दावा मिळकतींबाबत महसुल न्यायालयाकडे नोंदी अनुषंगाने वादाचा निर्णय वादीविरुध्द झाला असल्याने वादीने दावा मिळकतींचे प्रतिवादी क्र.१ ते १३ यांना वाटप करुन मागितले तेव्हा त्यांनी नकार देवून दावा मिळकती तबदिली करणार असे सांगितलेने वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

५. वादी पुढे कथन करतात की, दाव्याचा अंतिम निर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. दरम्यान प्रतिवादी क्र.१ ते १३ यास ताकीद देणे आवश्यक आहे. ताकीद दिल्यास त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, ताकीद न दिल्यास दाव्याचे कामी गुंतागुंत निर्माण होणार आहे व वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे नुकसार होणार आहे. वादीस सकृतदर्शनी केस आहे व न्यायाचा तराजूदेखील वादीच्या बाजूने आहे. सबब, प्रतिवादी क्र.१ ते १३ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीमध्ये दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत तिऱ्हाईत इसम अगर संस्था यांचा हक्क निर्माण करु नये अशी तूर्तातूर्त ताकीद देण्याची विनंती केली आहे.

६. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी क्र.१, ७, ८, ९, ११ व १२ यांनी प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे दाखल केले आहे व वादीचा दावा नाकारलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे, वादीने दावा मिळकतीच्या चतूःसिमा दिलेल्या नाहीत. त्यामुळे, दावा मिळकतींचा बोध होत नाही. दाव्याची वंशावळ अपूर्ण असून दाव्यामध्ये सर्वांना पक्षकार

केलेले नाही. वादीने वाटपाच्या दाव्यामध्ये हरीबा शेटे यांच्यापासून आलेल्या सर्व मिळकती सामील केलेल्या नाहीत. या सर्व कारणांवरुन वादीचा ताकीद अर्ज विचारात घेता येणार नाही.

७. प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादी हे कृष्णा हरीबा शेटे यांचे वारस म्हणून प्रतिनिधित्व करतात. परंतु, कृष्णा यांच्या कोणत्या पत्नीपासून कोणाचा जन्म झाला, कोणास कायदेशीर सत्व प्राप्त झाले याचा कोठेही वादीने खुलासा केलेला नाही. वादीने दाव्यामध्ये वडीलार्जित घर मिळकतीचा समावेश करुन त्याची किंमत दाखवून दाव्यात सामील करणे आवश्यक होते, परंतू तसे केले नाही. वादीच्या घराण्यात कृष्णा हरीबा शेटे यांना त्यांचा भाऊ सावळा व महादू यांच्यामध्ये स्पष्टपणे ज्या मिळकती आल्या त्या कृष्णाच्या वाटपाच्या मिळकती वादीने स्वतःच्या वारसांच्या ताब्यात असल्यामुळे सामील केलेल्या नाहीत. केवळ महादेव हरीबा शेटे व त्यांची पत्नी काशीबाई यांच्या मिळकतीबाबत वादींचा संबंध नसतानाही दाखल केलेला दावा कायद्याने विचारात घेता येणार नाही.

८. प्रतिवादी पुढे कथन करतात की, काशीबाई यांचे रे.दि.मु.नं.७३७/१९५० मध्ये सदर दाव्याच्या मिळकती काशीबाई हिस खाण्यास दिलेल्या मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे एकत्र कुटुंबाकडेच येणेचे होते. त्यामुळे कुटुंबासाठी सोयीप्रमाणे जो तो व्यवहार करत आलेला आहे. तसेच, तहसिलदार यांनी दि.१२.१२.२०१८ रोजीचे दिलेल्या निर्णयाप्रमाणे वादी यांनी दि.१२.०१.२०१९ रोजी दावा मिळकतीचे वाटप करुन मागितले इत्यादी लिहिलेला सर्व मजकूर वादीने खोटा लिहिलेला आहे.

९. वादींनी वंशावळीमध्ये नमूद केल्याचे मुळ पुरुष हरीबा शेटे हे होते. त्यांना बिभवी, गाव मौजे गांजे या गावीशेतजमीनी होत्या. म्हणून स.नं.१९७ याचे एकुण १६ पोटहिस्से पडले होते. हरीबा शेटे यांना प्रथम पत्नी यमुना हिचेपासून सावळा, महादू अशी दोन मुले तर दुसरी पत्नीपासून कृष्णा हा मुलगा झालेला आहे. सावळा यांना गणपत रामचंद्र, लक्ष्मण व महादेव अशी चार मुले तर फुलाबाई उर्फ सुलाबाई ही मुलगी अशी

अपत्ये आहेत. त्यापैकी गणपत व लक्ष्मण हे मयत आहेत. प्रतिवादी क्र.१ ही गणपत यांची एकमेव वारस मुलगी आहे. प्रतिवादी क्र.३ ते ६ हे लक्ष्मणचे वारस आहेत. तर प्रतिवादी क्र.८ हा सावळाचा मुलगा व प्रतिवादी नं.७ ही मुलगी आहे.

१०. महादु हरीबा शेटे यांचे लग्न काशीबाई यांच्यासोबत झाले असून त्यांना मुलबाळ नाही. दावा मिळकती या महादू हरीबा शेटे व त्यांची पत्नी यांना भावांच्या वाटपातून वाटून आलेलया मिळकती होत्या. त्यामुळे महादू यांच्या मृत्यूनंतर काशीबाई हिच कायदेशीर लग्नाची पत्नी म्हणून दावा मिळकतीची मालक झालेली होती. काशीबाई हिस मुलबाळ नसलेने तिच्या मिळकतीत सावळा व कृष्णाचा मुलगा नारायण यांनी हरकत करुन कब्जा करण्याचा प्रयत्न केला म्हणून काशीबाई हिने सातारा येथील दिवाणी कोर्टात रे.दि.मु.नं.७३७/१९५० चा दावा केला आणि दावा मिळकती या काशीबाई हिच्या मालकीच्या असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या दाव्यामधील सावळा हरीबा शेटे, नारायण कृष्णा शेटे व काशीबाई यांनी आपापसांत तडजोड केली. तडजोड हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकती या काशी महादू शेटे हिच्या ताब्यात दिल्या. काशीबाईच्या मृत्यूपश्चात सदर मिळकती या सावळा व नारायण यांना मालकी हक्काचे कब्जेस अनुसरुन देण्याचे कायम केले.

११. रे.दि.मु.नं.७३७/१९५० मध्ये जी तडजोड झाली त्या तडजोडीप्रमाणे काशीबाई यांनी त्यांच्या हयातीमध्ये कोणत्याही प्रकारे लेखी अगर तोंडी मिळकती हस्तांतरण न करता त्यांचेपश्चात सावळा व नारायण हेच पूर्ण मालक होतील अशाच तडजोडीचा हुकूमनामा झालेला आहे. त्या हुकूमनाम्याविरोधात वादी व त्यांच्या पूर्वहक्कदार यांनी कोठेही दाद मागितली नसल्याने व काशीबाई या दि.०६.०३.१९७७ रोजी मयत झाल्या, त्यामुळे सावळा हरीबा शेटे व नारायण कृष्णा शेटे हेच दावा मिळकतीचे हुकूमनाम्याप्रमाणे मालक झाले. त्यामुळे वादीचा दावा मिळकतीशी संबंध येत नाही. या कारणास्तवदेखील वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे.

१२. मुळ स.नं.१९७ चे एकुण १६ पोटहिस्से पडले. पैकी सावळा हरीबा शेटे

यांच्या वाटणीस स.नं.१९७/२, १९७/५, १९७/१०, १९७/११, १९७/१३, १९७/१५ अशा मिळकती वाटणीस आल्या तर कृष्णा हरीबा शेटे यांच्या वाटणीस स.नं.१९७/३, १९७/१२, १९७/१६, १९७/२ या मिळकती वाटणीस दिल्या. महादू हरीबा शेटे व त्यांची पत्नी यांना स.नं.१९७/१, १९७/४, १९७/७, १९७/९, १९७/१४, १९७/८ यामधील सामाईक क्षेत्रात वाटप दिले. अशाप्रकारे हरीबा शेटे यांची तीन मुले व पुढे त्यांच्या वारसांमध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले आहे. कृष्णा हरीबा शेटे यांना ज्या मिळकती वाटपात आलेल्या आहेत त्याच मिळकतीचे वाटप मागण्याचा वादी यांना कायदेशीर हक्क येतो. परंतू, वादी यांनी सदर मिळकतींचे वाटप न मागता काशीबाई महादू शेटे यांच्या मिळकतीचे वाटप करुन मागितलेले आहे. तसे वाटप करुन मागण्याचा वादींना अधिकार नाही.

१३. पूर्वी वडीलार्जित मिळकतींच्या झालेल्या वाटपाप्रमाणे तसेच सावळा व नारायण यांच्या वरील वारसांमध्ये वाटप झालेले असून प्रत्येकाच्या स्वतंत्र वहिवाटी आहेत. त्यांचा वादींशी संबंध नाही. काशीबाई यांच्या मृत्यूपश्चात दावा मिळकतीपैकी स.नं.१९७/४, १९७/८ मधील येणारा हिस्सा व १९७/७ व १९७/९ मधील ८आणे हिस्सा सावळा हरीबा शेटे यांच्या वहिवाटीस आहे तर स.नं.१९७/१ पूर्ण, १९७/१४ पूर्ण आणि १९७/७ व १९७/९ मधील ८आणे हिस्सा हा नारायण यांच्या वहिवाटीमध्ये आहे व पुढे त्यांच्या वारसांमध्ये तशा वहिवाटी चालत आलेल्या आहेत. त्यामुळे वादी अगर त्यांच्या वारसांचा सदर मिळकतींशी कोणताही संबंध येत नाही.

१४. काशीबाई हिला हिंदू वारसा कायदा कलम १४ प्रमाणे दावा मिळकती वाटपाने आलेल्या आहेत. त्यामुळे, त्या त्यांच्या पूर्ण मालकीच्या होत्या व ती तिच्या इच्छेप्रमाणे कोणासही देवू शकते. तोच कायदेशीर मुद्दा विचारात घेवून काशीबाई हिने दावा मिळकती सावळा व नारायण यांना हुकूमनाम्याप्रमाणे दिलेल्या आहेत. त्यामुळे नारायण यांच्या भावांचा कोणताही हक्कसंबंध दाव मिळकतींशी येत नाही.

१५. महसुल खात्याकडील फेर नं.११५ व त्यावरील आर.टी.एस.अपील

क्र.५१/२००६, फेरचौकशी अर्ज क्र.५९८/२०१४ आणि महसुल खात्याकडील तक्रारी विचारात घेता महसुल खात्याकडूनही वादीच्या सर्व तक्रारी फेटाळून लावलेल्या आहेत. आर.टी.एस.अपील १४/२०१९ च्या निर्णयाविरुध्द वादीने कोठेही दाद मागितलेली नाही. अशा परिस्थितीत वादीच्या मागण्या कायद्याने विचारात घेता येत नाही. दावा मिळकतींपैकी प्रतिवादी क्र.१० च्या नावे मृत्यूपत्र करुन ठेवल्याची प्रतिवादी क्र.१० ची तक्रार खोटी असून ती या प्रतिवादींना मान्य व कबूल नाही.

१६. नारायण शेटे यांनी समजून उमजून सुस्थितीत असताना कोणासही मृत्यूपत्र करुन दिलेले नाही. केवळ नारायण यांचे वय झालेले आहे, त्यांना आपण काय करतो याचे आकलन होत नव्हते. वृध्दापकाळात शरीरप्रकृती व विचार करण्याची शक्ती पूर्वीसारखी साथ देत नव्हती.नारायण शेटे यांच्या शारिरीक दूर्बलतेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१० यांनी तथाकथित फसवून मृत्यूपत्र करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते मृत्यूपत्र खोटे व लबाडीचे असून प्रतिवादी क्र.९, १०, ११ व १२ यांच्यावर बंधनकारक नाही. त्यामुळे, दावा मिळकतीचे प्रतिवादी हे मालक झाले आहेत हे चूकीचे व बेकायदेशीर लिहिलेले आहे. त्यामुळे वादीचा दावा व तूर्तातूर्त ताकीद अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१७. प्रतिवादी क्र.१० यांनी निशाणी क्र.३३ अन्वये त्यांची दाव्यास कैफियत व तूर्तातूर्त ताकीद अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.१० यांचया कथनाप्रमाणे वादीने खोटा व लबाडीचा दावा दाखल केलेला आहे. चतूःसिमा दाखल केलेल्या नाहीत. दाव्यामध्ये काही मिळकतींचा समावेश केलेला नाही. दावा मिळकती या हरीबाचा मुलगा महादू शेटे यांच्या प्रत्यक्ष वहिवाटीने व स्वतंत्र एकटयाच्या मालकी हक्काच्या होत्या. दाव्यामध्ये वंशावळ अपूरी दिलेली आहे. कृष्णा यांना किती पत्नी होत्या व कृष्णाची कोणती मुले कोणत्या पत्नीपासून झाली याचादेखील दाव्यात उल्लेख केलेला नाही. कृष्णा यास पारुबाई ही प्रथम पत्नी व अंजिराबाई ही द्वितीय पत्नी व गंगुबाई ही हयात असलेली तृतीय पत्नी. मात्र गंगुबाई हिस दाव्यात समाविष्ट केलेले नाही. यावरुनही दावा फेटाळण्यास पात्र आहे.

१८. वादीच्या दाव्यातील दावा मिळकतीच्या रेकॉर्डच्या नोंदी अनुषंगाने तहसिलदार यांनी १२.१२.२०१८ रोजी निर्णय दिला हा मजकूर बरोबर असला तरी वादीने दि.१२.०१.२०१९ रोजी वाटप करुन मागितले हा मजकूर खोटा लिहिलेला आहे. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही.

१९. प्रतिवादी क्र.१० चे पुढे असे कथन की, मुळ पुरुष हरीबा शेटे यांच्या मुळच्या बिभवी, ता. जावली गावी मुळ सर्व्हे नं.१९७ व १९६/२ या मिळकती होत्या. तसेच मौजे गांजे, ता. जावली या गावीही शेतजमीनी होत्या. पुढे मुळ स.नं.१९७ याचे एकुण १६ पोटहिस्से पडले होते. त्याप्रमाणे मुळ स.नं.१९७ चे १९७/१ ते १९७/१६ मध्ये रुपांतर फाळणीने झाले होते. हरीबा शेटे यांना दोन पत्नी नामे यमुनाबाई व पारुबाई अशा होत्या. कै.हरीबा यांना प्रथम पत्नी यमुना यांच्यापासून सावळा व महादू अशी दोन अपत्ये होती व द्वितीय पत्नी पारुबाई यांचेपासून कृष्णा नावाचा मुलगा झाला होता. कृष्णा यास तीन पत्नी होत्या. त्यापैकी कै. पारुबाई हिचेपासून नारायण व नथू उर्फ नथाची अशी दोन अपत्ये झाली. तसेच, द्वितीय पत्नी अंजिरा यांचेपासून मुलगा कै. दत्तात्रय झाला होता व त्यांची तृतीय पत्नी गंगुबाई हयात आहे.

२०. हरीबा यांचा मुलगा महादु हा १९३५ पूर्वीच मयत झाला होता. त्यास त्याची पत्नी काशी ही होती. पुढे प्रतिवादीचे आजोबा कै. कृष्णा हे मयत झाले. त्यामुळे, त्यांच्या मृत्यूनंतर या प्रतिवादीचे वडील कै. नारायण हे कृष्णा यांचे कुटुंबाची देखभाल करत होते. त्यामुळे, वादी व प्रतिवादींचा मुळ पुरुष कै. हरीबा यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस म्हणून सावळा व त्याचा भाऊ कै. महादू याची पत्नी काशी व कै. कृष्णा यांचे वारस नारायण हे थोरले असल्याने त्या तिघांमध्ये म्हणजेच सावळा, नारायण व काशी यांच्यामध्ये कै. हरीबा यांच्या मुळच्या बिभवी गावाच्या व गांजे गावाच्या शेतजमीनीचे व मेढा येथील घर मिळकतीचे आपापसांत वाटप करण्यात आले होत. त्या वाटपानुसार मुळच्या बिभवी, ता. जावली येथील मुळ स.नं.१९७/१ ते १९७/१६ व १९६/२ या मिळकतींचे त्या तिघांत आपसांत खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले होते.

सावळा यांना स.नं.१९७/२, १९७/५, १९७/१०/, १९७/११,

१९७/१३, १९७/१५ या शेतजमीनी देण्यात आल्या होत्या व आहेत. तसेच, कृष्णा यांचे सर्व वारसांमध्ये कै. नारायण यांच्या नावे व वाटणीत स.नं.१९७/३, १९७/१२, १९७/१६, १९६/२ या मिळकती प्रत्यक्ष वाटणी वहिवाटीत देण्यात आले होते. तसेच त्यांचे वाटणीत गांजे येथील शेतजमीन देण्यात आली होती. कै. महादू यांची पत्नी काशी यांचे वाटणीत स.नं.१९७/१, १९७/४, १९७/५, १९७/७, १९७/९, १९७/१४ या संपूर्ण मिळकती व १९७/८ मधील समाईकातील क्षेत्र अशा सर्व क्षेत्राचा सरस निरस मानाने विचार करुन वाटणी वहिवाटीत देण्यात आले होते.

२१. कृष्णा यांचे वारस दिलीप, विलास, श्रृतिका व कृष्णाचा मुलगा नथू उर्फ नाथा आणि दुसरा मुलगा दत्तात्रय यांनी नारायणच्या नावे वाटणीत आलेले क्षेत्र आपापसांत वाटून घेतले होते व आहे. तसेच सावळा यांच्या वाटणीत आलेले क्षेत्र सावळाच्या मुलांनी आपापसांत वाटून घेतलेले होते व आहे. तशा त्यांचया वाटणीत आलेल्या क्षेत्रांच्या नोंदी झालेल्या आहेत. मात्र कै. महादू मयत असल्याने त्याच्या मिळकतीत त्यांची पत्नी काशी ही वहिवाट करत होती. काही व्यवसायानिमित्त काशी या मुंबईला गेल्याने तिच्या वाटणीत आलेल्या मिळकती देखभालीसाठी प्रतिवादीचे वडील कै. नारायण व चुलत आजोबा सावळा यांच्या ताब्यात कब्जेवहिवाटीत स्वतंत्रपणे दिल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांची वहिवाट चालू होती. दावा मिळकतीमध्ये काशीबाईच्या हयातीत अपीलदाराचे वडील नारायण व प्रतिवादी क्र.१ ते ८ यांचे पूर्वहक्कदार सावळाराम शेटे यांच्या ताब्यात व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत खालील सर्व्हे नंबर १९७/१ हल्लीचा स.नं.१६/१ क्षेत्र २५ आर, स.नं.१९७/७ हल्लीचा स.नं.१६/७ क्षेत्र २१ आर यातील एक द्वितीयांश हिस्सा, तसेच स.नं.१९७/९ हल्लीचा स.नं.१६/९ क्षेत्र ६२ आर यापैकी ८आणे हिस्सा आणि स.नं.१९७/१४ हल्लीचा स.नं.१६/१४ क्षेत्र १५.२आर या जमीनी नारायण शेटे यांच्या प्रत्यक्ष ताब्यात व कब्जेवहिवाटीत देण्यात आल्या होत्या व तशी ७/१२ सदरी त्यांची इतर हक्कात नोंद होवून नारायण शेटे हयातीपर्यंत पोटगी देणार असे नमूद केले होते.

२२. सावळा यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस रामचंद्र वगैरे यांच्या प्रत्यक्ष ताब्यात व कब्जेवहिवाटीत स.नं.१९७/४ यासी हल्लीचा स.नं.१६/४ संपूर्ण हिस्सा, तसेच

स.नं.१९७/७ यासी हल्लीचा स.नं.१६/७ यातील ८आणेचा हिस्सा व स.नं.१६७/९ यासी हल्लीचा स.नं.१६/९ यापैकी ८आणेचा हिस्सा प्रत्यक्ष ताब्यात देण्यात आलेल्या होत्या व तशा वर नमूद केल्याप्रमाणे कै. सावळा व कै. नारायण यांच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत काशीच्या हयातीत होत्या.

२३. प्रतिवादी क्र.१० यांचे पुढे असे कथन की, काशी मुंबईवरुन परत आल्याने तिजला नारायण व कै. सावळा यांनी वर नमूद केलेप्रमाणे त्यांचा ताबा व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत असलेल्या जमीनींचा ताबा श्रीमती. काशी यांना परत देत नसल्याने तिने सातारा येथील दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांच्या कोर्टात स्पे.दि.मु.नं.७३७/१९५० चा दाखल केला होता. त्या दाव्याच्या कामी कै. महादूयांची पत्नी म्हणजेच त्या दाव्यातील वादी व प्रतिवादी कै. नारायण व कै. सावळा यांची तडजोड झाली व त्या तडजोडीप्रमाणे हुकूमनामा होवून दावा दि.०५.०२.१९५२ रोजी निकाली करण्यात आला होता. त्या हुकूमनाम्याप्रमाणे श्रीमती काशी महादू शेटे हिच्या ताब्यात व कब्जेवहिवाटीत तिच्या हयातीपर्यंत ताब्यात व उपभोग घेण्यासाठी ठरले होते व वर नमूद केल्याप्रमाणे ज्या त्या मिळकती कै. नारायण व कै. सावळा यांच्या कब्जेवहिवाटीत होत्या.

२४. कै. काशी महादू शेटे यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या त्यावेळी असणाऱ्या कब्जेप्रमाणे ज्याच्या त्याच्या कब्जा असणाऱ्या मिळकती म्हणजेच कै. नारायण व कै. सावळा यांच्या वर नमूद केल्याप्रमाणे ताब्यास असणाऱ्या मिळकती त्यांना कै. काशीच्या पश्चात कायमस्वरुपी मालकी हक्काने देण्याचे कै. काशी यांनी मान्य केले होते व तसा तडजोडीचा हुकूमनामा झालेला आहे व सदरचा रे.दि.मु.नं.७३७/१९५० चा हूकूमनामा अद्याप अस्तित्वात आहे.

२५. रे.दि.मु.नं.७३७/१९५० च्या हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीपैकी हल्लीचा स.नं.१६/४ संपूर्ण व स.नं.१६/७ आणि १६/९ यामधील ८आणे हिश्याचा कै. सावळा व त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस मालक झालेले होते व आहेत व त्याच हुकूमनाम्याप्रमाणे हल्लीचा स.नं.१६/१ व १६/१४ या संपूर्ण मिळकती तसेच स.नं.१६/७ व १६/९

यामधील ८आणे हिश्याची मिळकती कै. नारायण कृष्णा शेटे कायदेशीर मालक झाले होते व त्याप्रमाणे कै. सावळा व कै. नारायण यांची त्यांच्या पूर्वी असलेल्या कब्जेवहिवाटीप्रमाणे सन १९७७ नंतर काशीचे पश्चात कब्जेवहिवाटी सुरु झाल्या होत्या व आहेत.

२६. प्रतिवादी क्र.१० पुढे कथन करतात की, वादीने वरील नमूद परिस्थिती लपवून ठेवलेली आहे. तसेच, या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी मुलकी अधिकाऱ्यांशी संगनमत करुन संपूर्ण दावा मिळकतींना सन २००३ मध्ये फेरफार क्र.११५ अन्वये त्यांची म्हणजेच प्रतिवादींची ७/१२ सदरी नोंद लावून घेतली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी २००६ मध्ये कै. नारायण यांच्या अपरोक्ष वहिवाटीबाबतची रे.दि.मु.नं.७३७/१९५० च्या हुकूमनाम्याची वस्तुस्थिती व माहिती लपवून ठेवून स्वतःची नोंद लावून घेतल्याची माहिती मिळताच कै. नारायण यांनी मा. उपविभागीय अधिकारी यांच्याकडे फेरफार क्र.११५ विरुध्द आर.टी.एस.रिव्हीजन अर्ज क्र.५१/२००७ दाखल केला. त्याकामी फेरफार क्र.११५ ची नोंद रद्द करण्यात आली व रे.दि.मु.नं.७३७/१९५० चे हुकूमनाम्याप्रमाणे योग्य तो अभ्यास करुन मयताच्या खात्यास वारसांची नांवे दाखल करण्याबाबत तहसिलदार, जावली यांच्याकडे फेरचौकशीस पाठविण्यात आले होते.

२७. तहसिलदार यांच्याकडे रिव्हीजन अर्ज, फेरचौकशी आल्यानंतर आर.टी.एस./एस.आर./कावि/५९८/२०१७ असा नंबर देवून ते प्रकरण फेरचौकशीस तहसिलदार यांनी नेमले होते. दरम्यानच्या काळात दि.०७.१२.२०१३ रोजी कै. नारायण हे मयत झाले. परंतू, नारायण यांनी त्यांचया हयातील दि.११.०४.२०१३ रोजी रे.दि.मु.नं.७३७/१९५० चे हुकूमनाम्याप्रमाणे काशी महादू शेटे यांचेपश्चात कै. नारायण यांचे लाभात व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत मिळालेल्या मिळकतीतील मालकीहक्क सदरी प्रतिवादी क्र.१० यांना मृत्यूपत्राने दिला होता व आहे व ती बाब फेरचौकशी प्रकरणात मा. तहसिलदार, जावली यांच्या निदर्शनास आणून देवून सदरील प्रतिवादी हे मृत्यूपत्राने त्यांच्या वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या ताब्यात असणाऱ्या मिळकती प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत असल्याची बाब निदर्शनास अणून देवूनसुध्दा तहसिलदार, जावली यांनी मृत्यूपत्राचा विचार केला नाही व स.नं.१६/१, १६/१४ या संपूर्ण मिळकतीचा व स.नं.१६/७ व १६/९

यातील ८आणे हिश्यास कै. नारायण यांच्या सर्व मुलांची म्हणजे प्रतिवादी क्र.९ ते १२ यांच्या नावाची नोंद लावण्याबाबतचा आदेश फेरचौकशी प्रकरण आर.टी.एस./कावि./५९८/२०१७ चे निर्णयाविरुध्द या प्रतिवादी क्र.१० यांनी विभागीय अधिकारी सातारा यांच्या कोर्टात आर.टी.एस.अपील क्र.१६/१९ दाखल केलेले आहे.

२८. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे काशी महादू शेटे ही दावा मिळकतीची पूर्ण मालकीण झाली होती व तिचे इच्छेप्रमाणे ती कोणासही पूर्ण मालकी हक्काने देवू शकते. त्यामुळे, काशीचे मृत्यूपत्रात रे.दि.मु.नं.७३७/१९५० चे हुकूमनाम्याप्रमाणे कै. सावळा व कै. नारायण हे त्यांचे पूर्वकब्जात असलेले मिळकतीचे कायदेशीर मालक झाले होते व कै. सावळा यांच्या मृत्यूपत्रात प्रतिवादी क्र.१ ते ८ हे दावा मिळकतीपैकी स.नं.१६/४ या संपूर्ण मिळकतीचे व स.नं.१६/७ व १६/९ यातील ८आणे हिश्याचे कायदेशीर मालक झाले होते.

२९. त्याचप्रमाणे कै. काशीचे मृत्यूपत्रात रे.दि.मु.नं.७३७/१९५० चे हुकूमनाम्याप्रमाणे नारायण हे स.नं.१६/१ व १६/१४ या दोन्ही मिळकतींचे संपूर्ण व स.नं.१६/७ व १६/९ या मिळकतीपैकी ८आणे हिश्याचे कायदेशीर मालक झाले होते व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी करुन ठेवलेल्या मृत्यूपत्राआधारे सदरील प्रतिवादी क्र.१० हे त्या मिळकतीचे कायदेशीर मालक झालेले असून त्यांची त्या मिळकतीत कब्जेवहिवाट होती व आहे. वादी यांना प्रथमदर्शनी केस नसून न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने नाही. सबब, वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३०. वादी प्रतिवादी यांचे वादकथनावरुन, खालील वादप्रश्न उपस्थीत होतात, सदर वादप्रश्न, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी सकृतदर्शनी प्रकरण असल्याचे शाबीत करतात | |

| | | |
|---|---|---|
| | काय ? | **..होय..** |
| २) | न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने आहे काय ? | **..होय..** |
| ३) | मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **..होय..** |
| ४) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता :–**

३१. निशाणी क्र.३ सोबत गाव मौजे आगलावेवाडी, ता. जावली येथील गट नं.१६/१, १६/४, १६/७ याचे अवलोकन केले असता सदरचा गट हा काशी महादू शेटे यांच्या नावे आहे. गट नं.१६/८ हा रामचंद्र सावळा शेटे, महादेव सावळा शेटे, गणपती सावळा शेटे यांच्या नांवे तसेच शिवराम लक्ष्मण शेटे, दत्तात्रय लक्ष्मण शेटे, अशोक लक्ष्मण शेटे व सुमन लक्ष्मण शेटे यांच्या नांवे आहेत असे दिसून येत आहे व इतर हक्कात काशी कोम महादू शेटे अशी नोंद आहे.

३२. रे.दि.मु.नं.७३७/१९५० याचे निशाणी क्र.३/२ सोबत दाखल केलेल्या प्रतीचे अवलोकन केले असता स.नं.१९७/८, १९७/४, १९७/२, १९७/७, १९७/१ व १९७/१४ तसेच, मेढा गावठाणातील घर मिळकत याबाबत श्रीमती काशी महादेव शेटे यांनी सावळा हरी शेटे व नारायण कृष्णा शेटे यांच्या विरोधात सदर मिळकतींचा ताबा मिळण्याबाबत व नुकसान भरपाई मिळण्याबाबत दावा दाखल केलेला होता. सदर दाव्यामध्ये दि.०५.०२.१९५२ रोजी श्रीमती. काशी महादेव शेटे व सावळा हरी शेटे, नारायण कृष्णा शेटे यांच्यामध्ये तडजोड झाली. सदर तडजोडीमध्ये श्री.सावळा हरी शेटे व श्री. नारायण कृष्णा शेटे तसेच श्रीमती. काशी महादेव शेटे यांनी कबुल केले आहे की, वर नमूद या परिच्छेदातील मिळकती या महादू तुकाराम शेटे व सावळा हरी शेटे व नारायण कृष्णा शेटे यांच्या वडीलार्जित एकत्रात आहेत व त्याचे त्यांच्यामध्ये कधीही वाटप झालेले

नव्हते व नाही.

३३. सदर हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता पुढे असे दिसून येत आहे की, सदर दाव्याच्या मिळकती या श्रीमती. काशी महादेव शेटे यांनी त्यांच्या हयातीपर्यंत उपभोग करुन घेण्याचा होता व त्यांच्या मृत्यूनंतर सदर मिळकती या कब्जाने मालक म्हणून सावळा हरी शेटे व नारायण कृष्णा शेटे यांच्या होणार, तसेच श्रीमती काशी महादेव शेटे यांना दत्तक घेण्याचा अधिकार नाही. सावळा हरी शेटे व नारायण कृष्णा शेटे हे तिचे कायदेशीर वारस आहेत असे नमूद केलेले आहे.

३४. सदर हुकूमनाम्याचे अवलोकनावरुन स्पष्ट होत आहे की, काशी या हयात असेपर्यंत दावा मिळकतींचे वाटप झालेले नव्हते. काशी यांचा मृत्यू १९७७ साली झाल्यानंतर सदर हुकूमनाम्याप्रमाणे काशी उपभोग घेत असलेल्या मिळकती या कब्जाने सावळा हरी शेटे व नारायण कृष्णा शेटे यांना येणार होत्या.

३५. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे सावळा हरी शेटे, कृष्णा हरीबा शेटे व महादू हरीबा शेटे यांच्यामध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले होते. परंतू, १९७७ पर्यंत म्हणजे काशी महादू शेटे हयात असेपर्यंत दावा मिळकतींचे वाटप झाल्याचे दिसून येत नाही. तसेच, रे.दि.मु.नं.७३७/१९५० हा दावा काशी महादू शेटे यांनी वाटपाकरीता केलेला नसून ताब्याकरीता केला होता. त्यामुळे काशी महादू शेटे यांना सदर मिळकत ही वाटपाने आली होती असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, सदर मिळकत ही काशी महादू शेटे यांची पूर्णमालकीची झाली होती असेदेखील म्हणता येणार नाही. तसेच, सदर दाव्याच्या हुकूमनाम्यामध्ये काशी महादू शेटे ही पूर्ण मालक झाले असे कोठेही कथन झालेले नाही. तसेच, त्यामुळे तिला त्या मिळकती तिच्या मर्जीप्रमाणे अधिकार आला होता हेदेखील नमूद नाही.

३६. एकंदरीत कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, श्रीमती काशी महादू शेटे हे विनाअपत्य मयत झालेले आहेत. हिंदू वारसा कायदा

कलम १५ अन्वये त्यांना त्यांच्या पतीकडून येणाऱ्या मिळकतीमध्ये त्यांना अपत्य नसल्यामुळे जो हिस्सा आहे तो हिस्सा क्रमतः पतीचे वारसांना जातो. यामध्ये महादू हरीबा शेटे यांचे मृत्यूपश्चात त्यांना सावळा व कृष्णा हे दोन बंधू आहेत. त्यामुळे, काशी महादू शेटे यांचा हिस्सा सावळा व कृष्णा या दोन भावांना जातो हे प्रथमदर्शनी दिसत आहे.

३७. रे.दि.मु.नं.७३७/१९५० यामध्ये प्रतिवादी क्र.१ हे महादू हरीबा शेटे यांचे बंधू असून प्रतिवादी क्र.२ हे महादू हरीबा शेटे यांचे पुतणे आहेत. श्रीमती. काशी महादू शेटे यांना दावा मिळकत ही उपभोगण्यासाठी दिलेली होती. तिचे वाटप झालेले नव्हते. तसेच सावळा, महादेव व कृष्णा यांच्यातदेखील वाटप झाले नव्हते असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादी यांचा हिस्सा दिसून येत आहे व सदरच्या हिश्यामध्ये तिऱ्हाईत इसमांचे अधिकार निर्माण झाल्यास वादी यांचे अतोनात नुकसान होईल हेदेखील प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीस प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजूदेखील वादीच्या बाजूने झुकता आहे. वादीचा अर्ज मंजूर न केल्यास वादी यांचे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे, वादीचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते १३ यांना आदेशित करण्यात येते की, प्रतिवादी क्र.१ ते १३ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत दावा मिळकतीमध्ये दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत तिऱ्हाईत इसम अगर संस्था यांचा हक्क निर्माण करु नये अशी तूर्तातूर्त ताकीद देण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2024.03.22 17:14:08 +0530

**दिनांक** – २२.०३.२०२४ रविंद्र भ. खवले,

**ठिकाण** – मेढा **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Abhilash Sanjay Bagal |
| Court Name | : R. B. Khawale, J.M.F.C., Medha. |
| Order Date | : 22.03.2024 |
| Order signed by presiding officer on | : 22.03.2024 |
| Order uploaded on | : 26.03.2024 |